**प्रेसनोट दिनांकः-३०/०७/२०१९**
**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.**

**<u>“बाणेर मध्ये एल.ई.डी.चोरणारा पोलीस गस्ती मध्ये संशयिताला पोलीसांनी निलायम चौकात पकडले”</u>**

सध्या रस्त्यावरील चो-या रोखण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशन कडुन पोलीस गस्त मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आली आहे. या गस्तीमुळे रस्त्यावर होणारे गुन्हे कमी होण्यास मदत होत आहे. दत्तवाडी पोलीस स्टेशनचे तपासपथक अधिकारी कुलदिप संकपाळ आपल्या पथकासह विजयानर,निलायम टॉकिज चौक, पर्वती, जनता वसाहत या भागात पायी गस्त घालत असताना,निलायम चौक येथे एक इसम स्वतःकडे एल.ई.डी. टि.व्ही. संच घेऊन जात असलेला दिसला. त्याच्या संपुर्ण हालचालीवरुन त्याच्याबाबत संशय आल्याने त्याची चौकशी केली असता,त्याने दि.२४/०७/२०१९ रोजी इटरीट हॉटेल बाणेर येथुन पहाटे टि.व्ही. चोरला असल्याचे त्याच्या चौकशीत समजले. त्याचे नाव विचारता त्याने स्वतःचे नाव लकी शेरसिंग शेरावत,वय २२ वर्षे,रा.संतुर अपार्टमेंट,बालेचाडी पुणे असे सांगितले व त्याचे मुळ गाव चमोली,जिल्हा रुद्रप्रयाग, उत्तराखंड असे असुन,त्याला अटक करण्यात आले आहे.

या कारवाईत पोलीस उप-निरीक्षक,कुलदिप संकपाळ, पोलीस हवालदार,तानाजी निकम, राजुजाधव, पोलीस नाईक,सुधीर घोटकुले, पोलीस कॉन्स्टेबल,सागर सुतकर यांनी सहभाग घेतला आहे. यामध्ये चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद होता तो उघड झाला आहे.

**(देविदासघेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.